बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE : 020-25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे ऑलिम्पिकपटू श्री अमित रोहिदास यांचा सत्कार




**पुणे दिनांक २० सप्टेंबर २०२१** : श्री अमित रोहिदास यांचा कोलकाता येथे दिनांक १९ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या एका शानदार समारंभात बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचलक श्री हेमंत टम्टा यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. श्री अमित रोहिदास हे भारतीय राष्ट्रीय हॉकी संघातील बचावात्मक ( डिफेंडर ) व ड्रॅग-फ्लिकर (Drag-flicker) जागेवर खेळणारे खेळाडू असून टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत दिनांक ५ ऑगस्ट २०२१ रोजी जर्मनीला ५ – ४ अशा फरकाने हरवून ४१ वर्षानि हॉकीतील कांस्य पदक जिंकलेल्या भारताच्या राष्ट्रीय हॉकी संघात त्यांचा समावेश होता. कोलकाता विभागाचे विभागीय व्यवस्थापक श्री दिलीप कुमार राऊलो व उपविभागीय व्यवस्थापक श्री अजित कुमार चौधरी सुद्धा या सत्कार समारंभात उपस्थित होते.

**छायाचित्रात : ( डावीकडून उजवीकडे ) कोलकाता विभागाचे विभागीय व्यवस्थापक श्री दिलीप कुमार राऊलो , भारतींय संघातील हॉकीपटू श्री अमित रोहिदास , बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचलक श्री हेमंत टम्टा व उपविभागीय व्यवस्थापक श्री अजित कुमार चौधरी**